दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक ३२५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१८ फेब्रुवारी २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# आज छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळा सुशोभीकरणाचे उदघाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याजवळील सुशोभीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे सुशोभिकरण करण्याची मागणी केली होती. येथे मावळे आणि हत्ती शिल्प लावण्याच्या कामाला काही दिवसांपूर्वी सुरुवात करण्यात आली होती. हे काम पूर्ण झालेले आहे. अखेर १८ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा सुशोभीकरणाचे उदघाटन केले जाणार आहे.

पनवेल शहर महानगरपालिका ही रायगड जिल्ह्यातील पहिली महापालिका आहे. विशेष म्हणजे, शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी म्हणून रायगडाची विशेष ओळख आहे. या रायगडाचे प्रवेशद्वार असलेल्या पनवेल शहरात महाराजांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करण्याची मागणी लक्षवेधीद्वारे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी केली होती. या संदर्भात त्यानी सातत्त्याने पाठपुरावा केला.

पनवेल महापालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्या संकल्पनेतुन साकार झालेल्या छत्रपती शिव–ाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे सुशोभिकरणचे उदघाटन १८ फेब्रुवारी रोजी करण्यात येणार आहे. शिवाजी चौक येथील सर्वांचे आकर्षणाचे केंद्र बिंदू असलेले छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे सुशोभीकरण पूर्ण होत झाल्याने शिवप्रेमींनी विशेष आनंद व्यक्त केला आहे. याकरिता अंदाजे पावणे दोन कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. या परिसराचे संपूर्ण दगडी बांधकाम करण्यात आले आहे. ५२८ चौरस मीटर या जागेत १०० मीटर चौथरा बांधण्यात आला आहे.

रयतेला लेकराप्रमाणे मानणारा हा राजा केवळ महान युगपुरुष नव्हता तर मानवतेचे उत्कृष्ट तत्व–ज्ञान सांगणाऱ्या व आचरणाच्या महात्म्याप्रमाणे ते वंदनीय थोर युगपुरुष. अशा या युगपुरुषाचा इतिहास तरुणांबरोबरच शिवप्रेमींना प्रेरणादायी ठरण्यासाठी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. याठीकाणी एकुण २२ शिल्प उभारण्यात आले आहेत.

> शिव छत्रपतीच्या अश्वारूढ पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी वारंवार पाठपुरावा करत होतो. कित्येक वर्षांपासून सुशोभीकरण रखडले होते. सभागृहात विषय मांडून तो मंजूर करण्यात आला. सुशोभीकरणामुळे पनवेलची शान वाढली आहे. मला याचा अभिमान वाटतो कि, छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी मी पाठपुरावा केला. याचे उदघाटन होत असल्याने आनंद होत आहे
>
> **प्रीतम म्हात्रे, विरोधी पक्षनेते, पनवेल महापालिका**

# चिंता कायम; आज राज्यात ४,७८७ नव्या कोरोना रुग्णांची भर, ४० मृत्यू



**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात करोना संसर्गाबाबत चिं–तेचे वातावरण आजही कायम असून आजही दिवसभरातील रुग्णवाढीचा विचार करता कालच्या तुलनेत आज नव्या रुग्णांची संख्या तब्बल १ हजार १२४ ने अधिक आहे. आरोग्य विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, आज दिवसभरात ३ हजार ८५३ रुग्ण बरे होऊन घरी गेले असून दिवसभरात ४ हजार ७८७ नव्या रुग्णांची भर पडली आहे. काल ही संख्या ३ हजार ६६३ इतकी होती. आजची संख्या देखील बरे होणाऱ्या रुग्णांच्या संख्येहून अधिक आहे.

आज राज्यात एकूण ४० करोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. काल ही संख्या ३९ इतकी होती. आजची मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णांची संख्या लक्षात घेता सध्या राज्यातील मृत्यूदर २.४९ टक्के इतका आहे. राज्यात आजपर्यंत एकूण १९ लाख ८५ हजार २६१ करोनाबाधित रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९५.६२ टक्के इतके झाले आहे.

तसेच राज्यात आजपर्यंत तपासण्यात आलेल्या १ कोटी ५४ लाख ५५ हजार २६८ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी २० लाख ७६ हजार ०९३ नमुने पॉझिटिव्ह निघाले आहेत. हे प्रमाण १३.४३ टक्के इतके आहे. सध्या राज्यात १ लाख ९५ हजार ७०४ व्यक्ती होमक्वारंटाइनमध्ये आहेत, तर १ हजार ६६४ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत.

राज्यात आज एकूण ३८ हजार ०१३ इतके रुग्ण ॲक्टिव्ह, म्हणजे उपचार घेत आहेत. राज्यातील प्रमुख शहरांचा विचार केल्यास मुंबईत ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या ४ हजार ५३० इतकी असून ठाण्यात ही संख्या ४ हजार ६८१ इतकी. तर, पुण्यात ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या ७ हजार ५०९, औरंगाबाद येथे ७५१, नागपूर येथे ५ हजार ०५, कोल्हापूर येथे १६३, नाशिक येथे ९८१ इतकी आहे. राज्यात सर्वात जास्त ॲक्टिव्ह रुग्णसंख्या पुण्यात असून सर्वात कमी रुग्णसंख्या गडचिरोली आहे. येथे ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या ५७ इतकी आहे.

# दरोडयासारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीला रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने केले जेरबंद

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अशोक दुधे, पोलीस अधीक्षक, रायगड यांनी रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्राचा पदभार स्विकारल्यापासून जिल्हयाच्या गुन्हे अभिलेखावरील नजरेआड झालेल्या पाहिजे/फरारी आरोपींचा शोध घेवून, त्यांना गुन्हयामध्ये अटक करण्यावर विशेष भर दिला आहे. अशा ब–याच काळापासून नज–रेआड झालेल्या पाहिजे/फरारी आरोपींच्या शोधाकरीता खास पथके नेमण्याबाबत मा.महोदय यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांना सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे अन्वेषण शाख–ेचे पोलीस निरीक्षक श्री.दयानंद गावडे यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील पोलीस अधिकारी–अंमलदार यांची उपविभागनिहाय वेगवेगळी पथके नेमली होती. त्यापैकी रोहा उपविभागाच्या पोसई/ सचिन निकाळजे आणि पथकाने रोहा उपविभागातील पाहिजे/फरारी आरोपींची यादी घेवून, त्यामधील नमुद आरोपींची वर्गवारी केली. त्यावेळी नागोठणे पो.ठाणे कॉ.गु.रजि.नं.७४/२०१४, भा.द.वि. क.३९५ मधील काही आरोपीत यांना यापुर्वी अटक करण्यात आली असून त्यामधील काही आरोपीत हे अद्यापपावेतो नजरेआड असल्याचे लक्षात आले. त्यानुसार उक्त पथकाने नागोठणे पो.ठाणे कॉ.गु.रजि.नं.७४/२०१४, भा.द.वि. क.३९५ मधील यापुर्वी अटक आरोपींच्या सध्याचे वास्तव्य आणि इतर उपयुक्त माहिती प्राप्त केली. मिळालेल्या माहितीच्या आधारे आणि गोपनिय बातमीदारामार्फतीने नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपींची अधिक माहिती घेवून, प्राप्त माहितीचे तांत्रिक ..../२

## संक्षिप्त...

### काँग्रेस, राष्ट्रवादीसह शिवसेनेच्या शिष्टमंडळाचीही कृष्णकुंजवर धाव

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पुण्यातील सोमाटणे टोल नाका बंद करण्याप्रकरणी सर्व पक्षीय नेत्यांनी आज मनसेप्रमुखराज ठाकरे यांची भेट घेतली. तळेगाव येथील टोलनाका बंद करण्यात यावा अशी मागणी सर्व पक्षीय नेत्यांनी राज ठाकरेंना केली आहे.

तळेगाव येथील सोमाटणे टोलनाका बंद करण्यात यावा अशी मागणी तळेगावमधील नागरिकांची मागणी आहे. फक्त दीड किमी अंतरावर २ टोलनाके असल्याने कायद्याला हरताळ फासून टोलनाक्याआडून नागरिकांची लूट सुरु असल्याचं सर्व पक्षीय शिष्टमंडळाने सांगितले.

सर्व पक्षीय शिष्टमंडळानी दिलेल्या माहितीनंतर, ताबडतोब राज ठाकरे यांनी IRB Infrastruc-tureMo विरेंद्र म्हैसकरांना फोन केला. त्यानंतर राज ठाकरे यांनी मंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी देखील या विषयावर बोलतो, असं सांगितले. त्यानंतर विरेंद्र म्हैसकर यांनी देखील यावर लवकरात लवकर तोडगा काढण्यात येईल, असं आश्वासन राज ठाकरेंना दिले.

राज ठाकरेंना भेट देणाऱ्या सर्व पक्षीय शिष्टमंडळामध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, मनसे आणि जनसेवा विकास समिती यांचा समावेश होता, अशी माहिती जनसेवा विकास समिती, तळेगाव दाभाडेचे प्रवक्ते मिलिंद अचुट यांनी प्रसारमाध्यामांशी बोलताना दिली. तसेच राज ठाकरे यांनी राज्यातील टोलचे प्रश्न व्यवस्थितपणे हातळल्याने आम्ही त्यांची भेट घेतली असं मिलिंद अचुट यांनी सांगितले. त्याचप्रमाणे या टोलनाक्याप्रश्नी आम्ही राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची देखील भेट घेतल्याची माहिती मिलिंद अचुट यांनी दिली.

# अन्न व औषध प्रशासनाच्या छाप्यात दिड कोटी रुपयांचा खाद्यतेल साठा जप्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने नुकतेच मुंबई व पालघर परिसरातील अनेक ठिकाणी छापे टाकले असून चार खाद्यतेल रिपॅकर्स व घाऊक विक्रेते यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. सर्व ठिकाणी मिळून एकूण १ कोटी ६० लाख २६ हजार २५९ रुपयांचा खाद्य तेलाचा साठा जप्त करण्यात आला व एकूण ४० खाद्यतेलाचे नमुने विश्लेषणार्थ घेण्यात आले. एकूण १३ अन्न सुरक्षा अधिकारी यात सामील झालेले होते.

राज्यातील जनतेच्या आरोग्याची जबाबदारी हे प्राधान्य लक्षात घेवून, त्यांच्या दैनंदिन आह–ारातील अन्न पदार्थाचा दर्जा तपासण्याची जाणीव लक्षात ठेवून प्रशासनास प्राप्त होणा–या गोपनीय माहितीच्या आधारे छापे टाकण्याची कार्यवाही करण्यात येते. राज्यातील अन्न व्यवसायाचा दर्जा उंचावणे तसेच अन्न व्यावसायीकांना अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या तरतुदींचे पालन करण्यासाठी मार्गदर्शन करणे हा देखील या छाप्यांचा हेतू असतो. मुंबई आणि पालघर परिसरातील काही खाद्यतेल व्यवसायीकांवर नुकतेच छापे घालण्यात आले.

या छाप्यात मुंबई परिसरातील १) मे. ऑईल वेल ऑईल सेंटर, लोटस कॉलनी, गोवंडी, मुंबई–४३ २) मे. जि.के.ऑईल सेंटर, जि.एम.लिंक रोड, गोवंडी, मुंबई –४३ व पालघर जिल्ह्यातील ३) मे. ओमकार ट्रेडींग कंपनी, सातीवली, वसई, जि. पालघर, ४) मे. शिवाय ट्रेडींग कंपनी, सातीवली, वसई पूर्व, जि. पालघर या चार खाद्यतेल उत्पादक व रिपॅकर्स यांच्यावर कारवाई घेण्यात आली.

धाडीचा उद्देश व परिणाम तपासता यावा म्हणून प्रथम प्राधान्याने विश्लेषण अहवाल मागवण्यात आले. घेण्यात आलेल्या सर्व नमुन्यांचे विश्लेषण केलेअसता ४० नमुन्यांपैकी २८ नमुने प्रमाणीत व १२ नमुने कमी दर्जाचे असल्याचे आढळून आले आहेत.

एकूण घेतलेल्या शेंगदाणा ..../२

# इंधन व गॅस दरवाढीविरोधात काँग्रेस रस्त्यावर उतरुन तीव्र विरोध करणार : नाना पटोले



**दै.रायगड नगरी । मुंबई**

केंद्रात मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून सर्वसामान्य जनतेचे जगणे कठीण झाले असून अत्याचाराचा आ–लेख दिवसेंदिवस वाढत चालला आहे. पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात दररोज वाढ केली जात आहे. सध्या पेट्रोल प्रति लिटर ९६ रुपये तर डिझेल ८६ रुपये लिटर झाले आहे. त्यातच घरगुती वापराचा गॅस सिलेंडर ८०० रुपये झाला आहे. कोराना संकटामुळे लाखो लोकांचे रोजगार हिरावले गेले आहेत. नोकरदार, मध्यम वर्गीयांनाही जगणे कठीण झाले आहे त्याच दरवाढ करून मोदी सरकारने लूट चालवली आहे. मोदी सरकारने इंधन दरवाढ तात्काळ मागे घ्यावी अन्यथा काँग्रेस रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

गांधी भवन येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना नाना पटोले म्हणाले की, मोदी सरकार देशातील सर्वसामान्य लोकांचे सरकार नसून ते मुठभर लोकांच्या हितासाठी काम करणारे सरकार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती निचांकी पातळीवर आहेत. कच्च्या तेलाच्या आजच्या किंमती पाहता पेट्रोल ३५ रुपये तर डिझेल २५ रुपये लिटर असायला पाहिजे होते पण पेट्रोलने अनेक ठिकाणी शंभरी गाठली आहे. यामुळे महागाई वाढली आहे. सामान्य लोकांचे जगणे कठीण झाले आहे. पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र ..../२

# हुतात्मा हिरवे गुरुजी स्मारकाचा समाजासाठी वापर करण्याची मागणी

## स्वातंत्र्य सैनिक उत्तराधिकारी संघटना पनवेलचे सभागृह नेते परेश ठाकूर यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या हुतात्मा स्मारक परिसराचा वापर समाजाच्या उपयोगासाठी करावा अशी मागणी आज स्वातंत्र्य सैनिक उत्तराधिकारी संघटना पनवेलतर्फे पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांची भेट घेवून करण्यात आली.

यावेळी स्वातंत्र्य सैनिक उत्तराधिकारी संघटनेचे सुरेंद्र गोडबोले, बबन जगनाडे, श्याम वालावलकर व यतीन ठाकूर आदी उपस्थित होते. त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, पनवेलच्या मध्यवती ठिकाणी असलेल हुतात्मा हिरवे गुरुजी स्मारक, हे पनवेलची एक ऐतिहासिक ओळख आहे. ..../२



# कोप्रोली, बांधपाडा रस्त्यावर उद्भवणाऱ्या वाहतूक कोंडीने प्रवासी त्रस्त



**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरण तालुक्यातील कोप्रोली, बांधपाडा परिसरातील कंटेनर यार्डच्या व्यवस्थापनाने प्रवासी नागरीकांच्या रहदारीच्या रस्त्यावरच आपली वाहने उभी करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे अशा कंटेनर टेलर, ट्रक या मालवाहू वाहनांमुळे प्रवासी नागरीकांना नाहक वा–हतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. तरी वारंवार उद्भवणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी वाहतूक विभागाने आपले लक्ष केंद्रित करावे अशी मागणी प्रवाशी नागरीक करत आहेत.

उरण पुर्व विभागातील कोप्रोली, बांधपाडा,मोठी जुई,कळंबुसरे या ग्रामपंचायत हद्दीत कंटेनर यार्डने आपले बस्तान हे शासकीय नियमांची पायमल्ली ..../२

# केंद्र सरकारने माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीवरील खर्च कमी करणे हे दुर्दैवी : अनिल गलगली

**दै.रायगड नगरी । पेण**

माहिती अधिकाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी अगोदरच ३ राज्यात माहिती आयुक्तांची नेमणूक नसल्यामुळे महाराष्ट्र राज्यात साठ हजार अपील प्रकरण निकालाच्या प्रतीक्षेत असताना चालू वर्षाच्या अर्थ संकल्पात केंद्र सरकारने माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीवरील खर्च कमी करणे हे दुर्दैवी असल्याचे मत ज्येष्ठ माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी व्यक्त केले आहे.

राष्ट्र सेवा दल रायगड व ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने ग्रामीण भागातील सामाजिक कार्यकर्त्यांसाठी सुरू केलेल्या अभ्यास वर्गाचे तिसरे ..../२



# धोकादायक वळणावर

राजधानी दिल्लीत चालू असणारे शेतकऱ्यांचे आंदोलन हे निव्वळ शेतकऱ्यांचे आणि केवळ तीन कृषी कायद्यांच्या विरोधातले आंदोलन उरले आहे काय, अशी शंका घेण्याजोग्या घटना घडत आहेत. ग्रेटा थनबर्ग या पर्यावरण चळवळीतील युवतीने केलेल्या ट्विटनंतर ज्या घडामोडी घडत आहेत त्या पाहता या आंदोलनाच्या मागे पंजाब, हरयाणा आणि पश्चिम उत्तर प्रदेश या भागातील शेतकऱ्यांच्या संघटनांखेरीज इतर बऱ्याच संघटना, शक्ती आणि कार्यकर्ते ताकदीने उभे राहिले असावेत, असे दिसते. तसे राहण्यात काही चूक नाही. लोकशाही प्रक्रियेत एखादे आंदोलन विविध विचारांच्या संघटनांनी उचलून धरले जातेच. भारतात हा अनुभव नवा नाही. सत्तेवरच्या सरकारला विरोध करण्यातही काही गैर नसते. शेतकरी ते करीतच आहेत. मात्र, दिशा रवी या बेंगळुरूमधील २२ वर्षांच्या पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या युवतीला आधी दिल्ली पोलिसांनी अटक केली आणि नंतर निशिता जेकब व शंतनू मुळूक या दोन तरुणांच्या दिशेने आपला मोहरा वळवला. यातल्या निशिता जेकबच्या याचिकेवर आज-बुधवारी उच्च न्यायालय निकाल देईल अशी अपेक्षा आहे. शंतनू मुळूक या मूळ बीडच्या तरुणालाही मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने अंतरित जामीन दिला आहे. या तीनही तरुणांचा संबंध ग्रेटाने चुकून किंवा मुद्दाम ट्वीट केलेल्या 'टूल-कीट'शी असल्याचा पोलिसांचा संशय आहे. टूल-कीट म्हणजे आंदोलनपत्रिका. आपल्या आंदोलनाची अशी पत्रिका तयार करून ती समाज माध्यमांद्वारे प्रसृत करण्याची रीत अलीकडे जगभरात रुळली आहे. यातही काही चूक नाही. मात्र, या आंदोलन पत्रिकेत नमूद केलेल्या काही बाबी आक्षेपार्ह आणि 'राजद्रोह' या सदरात जाऊन बसतात, असा दिल्ली पोलिसांचा आक्षेप दिसतो आहे. त्यामुळे, या कारवाईला अचानक महत्त्व आले. हे टूल-किट बनवणे, त्यात सुधारणा करणे आणि ते सगळीकडे पसरविणे यात अनेक स्वयंसेवी संस्था गुंतलेल्या दिसतात. यातली एक संस्था ग्रेटाचीही आहे. मात्र, यातल्या 'पोएटिक जस्टीस' या दुसऱ्या स्वयंसेवी संघटनेवर ती खलिस्तानवादी असल्याचा पोलिसांचा ठपका आहे. पंजाबातील किंवा कॅनडातील खलिस्तानवादी संघटना या पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंध ठेवतात, यातही नवे काही नाही. हा सारा घटनाक्रम पाहता प्रामाणिक शेतकऱ्यांचे आंदोलन एकीकडे आणि या आंदोलनाचा लाभ उठविण्यासाठी चाललेले विघातक प्रयत्न दुसरीकडे; असे तर झालेले नाहीना, हे तपासण्याची वेळ येऊन ठेपली आहे. शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या अनेक स्वयंसेवी संस्था असून त्या परस्परांशी जोडलेल्या आहेत. त्यांच्यातल्या काहींच्या वेबसाईट पाहिल्या तर भारतात केवळ अत्याचार, भ्रष्टाचार आणि नरसंहार चालू आहे, अशी कल्पना होते. भारतात सर्व प्रकारचे अत्याचार व भ्रष्टाचार होतात, हे खरेच आहे. मात्र, ते भारताचे अत्यंत एकांगी, पूर्वग्रहदूषित आणि सत्यापलाप करणारे चित्र ठरते. करोनाशी जबरदस्त व यशस्वी लढा देणारा आणि या काळात विक्रमी कृषी उत्पादन घेणाराही भारत आहेच ना. अशावेळी, आंदोलकांना पाठिंबा देणाऱ्या संस्था व संघटना भारताचे असे विकृत चित्रण का प्रसारित करीत आहेत, असा प्रश्न विचारायला हवा. आपल्याला विरोध करणारा प्रत्येक आंदोलक म्हणजे राष्ट्रविरोधी शक्तींच्या हातातले बाहुले आहे, असा समज जसा सत्ताधाऱ्यांनी करून घेणे चूक आहे; तसेच, सत्ताधाऱ्यांना विरोध करताना देशाच्या हिताला कुठे बाधा तर येत नाही ना, हे पाहण्याची जबाबदारी आंदोलकांची असते. दुर्दैवाने, भारतात राजकीय स्वार्थासाठी कुणाची मदत घ्यायची, याचा विवेक राखला जात नाही. आज जे सत्ताधारी आहेत, त्यांच्याही अनेक आंदोलनांमधून राष्ट्रविरोधी शक्तींना काहीवेळा बळ मिळाले आहे. आता केंद्र सरकार आणि खरेखुरे शेतकरी आंदोलक यांनी लवकरात लवकर शहाणपण दाखवून बोलणी यशस्वी करणे, हा एकमेव मार्ग आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत चर्चेची तयारी दाखवूनही आता बरेच दिवस लोटले. पण अजून ते स्वत: शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींशी थेट बोललेले नाहीत. आंदोलक व सरकार यांनी परस्परांना दमविण्याची आणि नमविण्याची भूमिका आता सोडून द्यायला हवी. तशी ती सोडली नाही तर या आंदोलनात घुसणाऱ्या वेगळ्याच शक्ती देशाचे मोठे नुकसान करतील. भारत हा आता छोटा देश राहिलेला नाही. तिथल्या घडामोडींकडे जगाचे लक्ष असते. भारताची वाटचाल जितकी बिघडेल, तितके ते अनेकांना हवेच असते. हे सारे लक्षात घेऊन केंद्र सरकारने खरे आंदोलक आणि त्यांच्या आडून आपला स्वार्थ साधणारे पंचमस्तंभी यांच्यातला फरक ओळखायला हवा. 'टूल-कीट'वाल्यांवर कारवाई करताना नांगरधारी आणि शेतात काम करण्यासाठी विळा-कोयता हातात घेणाऱ्या शेतकऱ्यांचे समाधान मात्र करायलाच हवे. पोलिसी बडगा उगारताना सगळे आंदोलनच बदनाम केले तर हे नवे वळण अधिकच धोकादायक ठरेल.

# आदिवासी विद्यार्थी- विद्यार्थीनीसह जन्मदिन साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सर्वत्र जगात कोरोना साथ असल्याने सर्व वातावरण, परिस्थिती भयभीत झाली आहे, कोणताही आनंद राहिला नाही मात्र तरीही कुठे तरी सामाजिक भान ठेवून आपल्याला आनंद कसा निर्माण करता येईल , आणि समाजामध्ये आपण आधुनिक शहरामध्ये स्थायिक झालो असलो तरीही काही दुर्गम ग्रामीण भागमध्ये अजूनही आपले आयुष्य जगणे या पलीकडे काहीही माहीत नाही.

नवी मुंबईमध्ये घणसोली येथे स्थायिक असलेल्या अधिक्षिका पदावर कार्यरत माधुरी लोखंडे यांनी समाजाप्रती आपले काही देणं आहे, म्हणून यावर्षी राज्य शासनाने फक्त नववी आणि दहावी शाळा सुरू केली आहे, अलिबाग तालुक्यातील कोलघर गावातील शासकीय माध्यमिक अदिवासी आश्रम शाळा कोलघर येथील नववी आणि दहावी मध्ये शिकत असलेल्या ७५ आदिवासी विद्यार्थी विध्यर्थिनी सोबत आपला जन्मदिन साजरा करीत विद्यार्थ्यांना केक आणि खाऊ वाटप करून वेगळा आनंद देण्याचा प्रयत्न केला.

यावेळी वरिष्ठ शिक्षक चंद्रकांत काळे, शिक्षक इर्शाद सनदी, अधीक्षक हरीश अरबट, सुभाष म्हात्रे, प्रदीप चौधरी, हरीश सताने आणि कर्मचारी परिवार उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील कोलघर गाव असून मोठया प्रमाणात रायगड जिल्ह्यामध्ये अदिवासी समाज वास्तव्यास आहे, तर त्या गावातील वाडी आजूबाजूचे गावातील पालक उदरनिर्वाह साठी इतरत्र कामासाठी जातात, तर त्याच्या मुलांना योग्य शिक्षण मिळावे म्हणून शासनाने आदिवासी विभाग मार्फत निवासी आश्रमशाळा सुरु केल्या आहेत, तर तेथे आदिवासी समाज आपल्या मुलांना तेथे शिक्षणासाठी दाखल करतात, आणि शिक्षण पूर्ण करतात, त्यामुळे आपण शहरात स्थानिक झालो असलो, तरी आपला जन्मदिन विद्यार्थी विद्यार्थिनी सह साजरा करून त्यांना झालेल्या आनंदात स्वतः आनंद मिळत असल्याचे मनोगत माधुरी लोखंडे यांनी व्यक्त केले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री.छगनलाल शंकरलाल गजरा, रा.बी/२०४, प्रणय लीला को.ऑप.हौ.सोसायटी, पिरामल नगर ऑफ एस.व्ही.रोड, गोरेगाव (वेस्ट) मुंबई, मोतीलाल नगर पिन कोड ४००१०४ यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीपैकी सौ. गीता कांतीलाल भानुशाली यांचे मालकीची ००.०२.०० हे.आर.पॉ. इतके क्षेत्राची जमीन कायम खरेदी खताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वावजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ७८ | १ | ०-३९-९०<br>पो.ख. ०-०१-३०<br>एकूण ०-४१-२० | ०.३८ |

वरील मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लीन, टेनन्सी, वील, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदलाबदल व येणे जाणे, वहिवाट, सुविधाधिकार किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा सदर खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात स्वतःहून हजर होवून आमचेकडे खालील नमूद केलेल्या पत्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ०७ दिवसांचे आत कळवावी. वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अथवा संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही किंवा असल्यास तो आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभात होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणतीही हरकत आल्यास ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : उरण
दिनांक : १८/०२/२०२१

**सही/-**
**ॲड.उदय प्रकाश मोकल**
**मु.पो.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.९०८२९११९१३**

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**






## जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात
On Admission
टेनन्सी अपिल क्रं. /२०२१

१) श्री.बाळाराम बुधाजी पाटील — अपिलार्थी
रा.सांगडे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
विरुद्ध
२) श्री.नथु सखाराम पतंगे
रा.सांगडे, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७४ नुसार मौजे : सांगडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं.१७८/५ विरुद्ध अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दि.०८/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : सांगडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्रं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | १७८ | ५ | ०.१२.१० | ०.३७ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०९/०२/२०२१

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री.रतन त्रिंबक म्हात्रे वगैरे ६१ रा.मु.खुटरी, ता.पनवेल, जि.रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १०८ | १ | ०-४६-००<br>पो.ख. ०-०२-०० | ४.०१ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागवर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल
दिनांक : १७/०२/२०२१

**सही/-**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**
**शॉप नं.१३०, म्युन्सिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केट जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

मे.पांडे सो. यांचे कोर्टात
अर्जदारांतर्फे वकील
ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.२१४/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२२/०३/२०२१

श्री.दिनकर गणपत कोळी — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत तरघर तर्फे
मा.ग्रामसेवक सो — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.दिनकर गणपत कोळी यांनी त्यांची आजी कै.भागुबाई महादेव कोळी हिचे निधन दि.१०/०६/१९६५ रोजी मौजे : कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाले होते. तथापि सदर अर्जदार यांनी त्यांची आजी कै.भागुबाई महादेव कोळी यांचे निधन दि.१०/०६/१९६५ रोजी मौजे : कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाल्याबाबत नोंद होवून मिळणेकरिता मे.न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. तथापि सदर अर्जास कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा या कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये व मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कारवाई करेल व ते अर्जदार यांची आजी कै.भागुबाई महादेव कोळी यांचे मृत्यूसंबंधी योग्य ते आदेश मंजूर करेल. आज दि.१७/०२/२०२१ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने केले जेरबंद

विश्लेषण केले. आणि संकलित केलेल्या संपुर्ण माहितीचे क्रमनिहाय वर्गवारी करुन नागोठणे पो.ठाणे कॉ.गु.रजि.नं.७४/२०१४, भा.द.वि.क.३९५ या गुन्हयामधील पाहिजे आरोपीत हबीबुल्ला जाखाउल्ला खान, रा.शांतीनगर, आझाद मोहल्ला, वडाळा, मुंबई यास ताब्यात घेतले. अशा प्रकारे तब्बल ०८ वर्षापुर्वी दाखल नागोठणे पो.ठाणे कॉ.गु.रजि. नं.७४/२०१४, भा.द.वि.क.३९५ या गंभीर गुन्हयातील पाहिजे आरोपीत हबीबुल्ला जाखाउल्ला खान, रा.शांतीनगर, आझाद मोहल्ला, वडाळा, मुंबई यास ताब्यात घेवून त्यास पुढील कारवाईकरीता नागोठणे पोलीस ठाण्याकडे सुरक्षितरित्या सुपुर्द करण्यात आले आहे. त्याबाबतचा पुढील तपास नागोठणे पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री.अशोक दुधे यांचे मार्गदर्शनानूसार व मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.सचीन गुंजाळ यांचे अधिपत्याखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.दयानंद गावडे, पोलीस उपनिरीक्षक सचिन निकाळजे व पोलीस अंमलदार प्रशांत दबडे, स्वप्निल येरुणकर, राजेंद्र गाणार, देवराम कोरम आणि सायबर सेलचे अक्षय पाटील या पथकाने केली आहे.

## दिड कोटी रुपयांचा खाद्यतेल साठा जप्त

तेलाच्या ०६ नमुन्यापैकी ०६ नमुने (१०० टक्के) कमी दर्जाचे असल्याचे आढळून आले. एकूण घेतलेल्या मोहरी तेलाच्या ११ नमुन्यापैकी ०३ नमुने (२७.२७ टक्के) कमी दर्जाचे असल्याचे आढळून आले. एकूण घेतलेल्या सोयाबिन तेलाच्या ०२ नमुन्यापैकी ०२ नमुने (१०० टक्के) प्रमाणीत असल्याचे आढळून आले. एकूण घेतलेल्या सुर्यफुल तेलाच्या ०२ नमुन्यापैकी ०२ नमुने (१००.०० टक्के) कमी दर्जाचे असल्याचे आढळून आले. एकूण घेतलेल्या पामोलिन तेलाच्या १३ नमुन्यापैकी ०१ नमुने (७.६९ टक्के) कमी दर्जाचे असल्याचे आढळून आले. एकूण घेतलेल्या कॉटनसिड तेलाच्या ०२ नमुन्यापैकी ०२ नमुने (१०० टक्के) प्रमाणीत असल्याचे आढळून आले. एकूण घेतलेल्या राईस ब्रान तेलाच्या ०४ नमुन्यापैकी ०४ नमुने (१०० टक्के) प्रमाणीत असल्याचे आढळून आले. ही कारवाई श्री शशिकांत केकरे, सह आयुक्त (अन्न), बृहन्मुंबई विभाग, अन्न व औषध प्रशासन, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रमाणीत आढळलेल्या खाद्य तेलाचा जप्तसाठा तात्काळ विक्रीसाठी खुला करण्याचे व अप्रमाणीत नमुन्या बाबतीत कडक कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश अन्न सुरक्षा आयुक्तांनी दिले आहेत. नागरीकांना अन्न पदार्थाच्या किंवा औषधांच्या दर्जा विषयी काही शंका असल्यास प्रशासनाचा टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर तक्रार करावी असे आवाहन अन्न सुरक्षा आयुक्त यांनी केले आहे.

## काँग्रेस रस्त्यावर उतरून तीव्र विरोध करणार

प्रधान यांनी तर या दरवाढीसंदर्भात हात वर केले असून पेट्रोल डिझेलच्या किमती आपल्या हातात नसल्याचे राज्यसभेत स्पष्ट केले आहे. भाजपा सरकारने सत्तेवर येताना पेट्रोल डिझेलचे दर कमी करण्याचे आश्वासन दिले होते त्या आश्वासनालाही त्यांनी हरताळ फासला आहे. लोकांचे खिसे कापण्यासाठी जनतेने भाजपाला सत्ता दिली का? याचे उत्तर मोदी सरकारने जनतेला दिले पाहिजे.

युपीएचे सरकार लोकशाही मार्गाने चालणारे सरकार होते म्हणूनच ७० रुपये लिटर पेट्रोल झाले त्यावेळी अभिनेते अमिताभ बच्चन, अक्षयकुमार आणि इतर सेलिब्रिटींनी त्या इंधन दरवाढीविरोधात ट्विट करून संताप व्यक्त केला होता. आता पेट्रोलने शंभरी गाठली असतानाही अमिताभ बच्चन, अक्षयकुमार यासह एकाही सेलिब्रिटीने त्याविरोधात ट्विट का केले नाही, ते आता गप्प का आहेत? मोदी सरकारच्या हुकूमशाही विरोधात बोलण्याची त्यांची हिम्मत होत नाही का? असा सवाल नाना पटोले यांनी उपस्थित केला आहे. मोदी सरकारने इंधन व गॅस दरवाढ तात्काळ कमी करून सामान्य जनतेला दिलासा द्यावा अशी मागणीही नाना पटोले यांनी केली. या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व प्रवक्ते सचिन सावंत, अतुल लोंढे, देवानंद पवार व राजन भोसले हे उपस्थित होते.

## स्मारकाचा समाजासाठी वापर करण्याची मागणी

परंतु आज तेथे कायम स्वरुपी ब्रम्हकुमारी परीवाराचे लोक वावरतात, त्यांचे कार्यकम करतात व बदल्यात ते उद्यान मेंटेन करतात. उद्यानात आठवड्यातून दोन दिवस त्यांचा समुपदेशनाचा कार्यकम असतो, त्यांचा समुपदेशनाचा कार्यकम जेंव्हा असतो तेंव्हा ते स्मारकाच्या आत असणारे छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक व इतर काही फोटो काढून ठेवतात व १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, कांती दिन या दिवशी जेंव्हा महानगरपालिकेचे कार्यकम असतात तेंव्हा ते फोटो पूर्ववत लावतात. जो त्यांना कोणताही अधिकार नाही. हे स्वतंत्रता सेनांनीचे स्मारक असल्या मुळे त्याचा मुळ ऊद्देश साध्य होतांना दिसत नाही. केवळ ब्रम्हकुमारी देखभाल करतात म्हणुन त्यांचाच वावर तेथे असावा हे पटत नाही. तरी महानगरपालिकेने या वास्तूचा उपयोग स्मारका मध्ये छोटी प्रदर्शन भरवणे (बेलापुर येथील अरबन हट) प्रमाणे, बचत गट, आदिवासी वस्तु विकी यांसाठी स्मारकाची बाहेरील जागा अल्प दरात भाड्याने देणे, प्रवचने, साहित्य, कवी संम्मेलने, बैध्दीक, छोट्या मुलांचे चित्रकला, हस्तकला, गाणी, नृत्य यांसाठी संस्थांना अल्प दरात भाड्यांने देणे, छोटे कार्यकम जसे हळदी कुंकू, भोंडला, सांस्कृतिक कार्यकम, वाढदिवस या करता महानगरपालिके तर्फे भाड्याने देणे. इतर अनेक ही कल्पना पुढे येतील पण पनवेल शहराच्या मध्यवती असलेली ही वास्तु एकल न होता वावरती झाली पाहीजे. येथे आत व बाहेर रायगड मधील प्रसीध्द स्वात्रंर्त्य सैनीकांची तैल चीत्रे, शिवराज्याभिषेक ई. चित्रे रंगवली पाहीजेत. पनवेल तालुक्यातील सर्व स्वात्रंर्त्यसैनीकांची नावे असलेली कोनशीला बसवली पाहीजे. स्वातंर्त्य सैनिकांचे ऊत्तराधीकारी म्हणुन आंम्ही आपणास नक्की मदत करु व स्वयंसेवकाचें काम करु व वास्तु जागती ठेऊ.

तरी आपण आपल्या स्तरावर या वास्तुचा कायापालट करुन ती सर्वसामान्य नागरीकांसाठी वापरती होईल अशा प्रकारचे नियोजन कराल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या निवेदनाची दखल घेत सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सकारात्मक दुजोरा देवून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन या शिष्टमंडळाला दिले आहे. तसेच याबाबत लवकरच आयुक्तांसोबत भेट घेवून त्यांच्यासमोर हा विषय मांडू असे आश्वासन दिले आहे.

## वाहतूक कोंडीने प्रवासी त्रस्त

करून बसविण्यास सुरुवात केली आहे. तसेच कंटेनर यार्ड मध्ये ये- जा करणारे वाहन चालक हे आपली वाहने प्रवाशी नागरीकांच्या रहदारीच्या रस्त्यावरच पार्किंग करुन ठेवत आहेत. त्यात संध्याकाळच्या सुमारास ग्वोबिकाँन, आँल कार्गो, ट्रान्स इंडिया, अमेया लाँजिस्टीक, कारवाँन, काँन्टीनेटर या कंटेनर यार्ड मधून ये - जा करणारी अवजड वाहने ही बेशिस्तपणाने रस्त्यावरून मार्गक्रमण करत असल्याने संध्याकाळच्या सुमारास वारंवार वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत आहे.

एकंदरीत वारंवार उद्भवणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे रुग्णांना, चाकरमान्यांना, प्रव-ाशी नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तरी वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी उरण पुर्व विभागातील कोप्रोली,बांधपाडा रस्त्यावर उद्भवणाऱ्या वाहतूक कोंडीवर ठोस उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी ही मागणी प्रवाशी नागरीक करत आहेत.

## अंमलबजावणीवरील खर्च कमी करणे हे दुर्दैवी

पुष्प बांधनवाडी येथे संपन्न झाले. माहितीचा अधिकार व त्याची अंमलबजावणी या विषयावर ज्येष्ठ माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी मार्गदर्शन करताना गलगली पुढे म्हणाले की, सत्तेवर येताच राजकीय पक्ष आपली भूमिका बदलतात. कारण जे पक्ष विरोधी पक्षात असतात ते माहिती अधिकार कायद्याचे समर्थन करतात आणि सत्तेवर येताच माहिती अधिकार कायदाला या न त्या प्रकारे विरोध करत असतात असे सांगितले.

ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ह्या अभ्यास वर्गास शिक्षण हक्क सभेचे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष रमेश पाटील, मारुती गायकवाड, डदत्ता पाटील, लॉ.कॉलेजचे प्रा.संदीप घाडगे, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे कार्यकारी सदस्य प्रशांत पाटील, बालग्राम मित्र राजू पाटील, तेजस चव्हाण, राजेश रसाळ, जीविका मोरे, राजेश पाटील यांच्यासह ग्रामीण भागात स्वयंप्रेरणेने सामाजिक काम करणारे कार्यकर्ते, महिला व तरुण उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेली 'मराठी वेशभूषा स्पर्धा' रद्द

**दै.रायगड नगरी । पनवेल**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त घेण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांना महाराष्ट्र शासनाने परवानगी नाकारली आहे, त्यामुळे भारतीय जनता पार्टी प्रभाग क्र. १९ च्या वतीने बुधवार दिनांक १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेली 'मराठी वेशभूषा स्पर्धा' रद्द करण्यात आली आहे, अशी माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

## रिक्षाच्या धडकेत तरुण जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका भरधाव रिक्षाच्या धडकेत तरुण जखमी झाला असून या प्रकरणी रिक्षा चालकाच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अल्केश कदम हा तरुण पायी चालत असताना नवीन पनवेल माथेरान रोडवरुन भरधाव वेगाने जाणार्या रिक्षाने त्याला धडक दिल्याने झालेल्या अपघातात कदम याच्या पायाला जबर जखम झाली आहे. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## वीर वाजेकर पुण्यतिथी संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

रयत शिक्षण संस्थेचे, तु.ह.वाजेकर विद्यालय फुंडे येथे उरण महालण विभागाचे शिक्षण महर्षी तुकाराम हरी वाजेकर यांची ४० वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. उरण तालुक्यातील महालण विभागातील दहा गावातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे म्हणून फुंडे महालण हायस्कूलची स्थापना करून खऱ्या अर्थाने कर्मवीर अण्णांचा वारसा चालवून, उरणचे राजे आणि शिक्षण महर्षी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वीर वाजेकारांची ४० वी पुण्यतिथी विद्यालयात संपन्न करण्यात आली. यावेळी विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य श्री.मोहन पाटील, पर्यवेक्षक सौ.आशा मांडवकर, श्री.जी. सी.गोडगे, ज्युनिअर प्रमुख श्री.व्ही.के.कुटे, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री.एच.एन.पाटील, सौ.दर्शना माळी आणि सर्व शिक्षक वृंद यांच्या शुभहस्ते वाजेकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रत्येक वर्गशिक्षकांनी आपापल्या वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना वीर वाजेकरांच्या कार्याची महती सांगितली. प्रत्येक वर्गातील दोन-दोन विद्यार्थ्यांनी वाजेकरांच्या जी-वनावर आधारित भाषणे केली.अशा रीतीने फुंडे हायस्कूलमध्ये वाजेकर पुण्यतिथीचा सोहळा संपन्न झाला.

# पालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळांचे हस्तांतरण शक्य ; येत्या महासभेत निर्णय होण्याची शक्यता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पालिका स्थापने पासून राखडलेला पालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळांचा प्रश्न लवकरच सुटण्याची शक्यता असून, येत्या महासभेत या बाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.२०१६ साली स्थापित झालेल्या पनवेल पालिका हद्दीत समाविष्ठ २३ ग्रामपंचायत हद्दीतील २९ गावांमध्ये जिल्हा परिषदेमार्फत चालवल्या जाणार्या ५२ प्राथमिक शाळांचे पालिकेकडे हस्तांतरण अद्यापही रखडले आहे. झेडपी शाळांच्या इमारतींच्या मोफत मालकी हक्कासोबत ५१ शाळांमध्ये कार्यरत असलेल्या ३१५ शिक्षकांच्या वेतनाच्या मुद्द्यावरून रखडलेल्या या हस्तांतरण प्रक्रिये करिता पालिका आयुक्तांमार्फत जिल्हा परिषदे कडे करण्यात आलेल्या पत्रव्यवहारानुसार पालिके मार्फत मांडण्यात आलेल्या मुद्यावर ५१ शाळांच्या इमारती विना मोबदला पालिकेकडे सोपवण्यास तसेच सद्य स्थितीत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत असलेल्या ३१५ शिक्षकांना पालिका हद्दीबाहेरील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये वर्ग करण्यास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आल्याने येत्या महासभेत पालिकेत समाविष्ठ ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांच्या हस्तांतरणाचा मुद्दा निकालात निघणार आहे.

जिल्हा परिषद शाळांची सद्य स्थिती : पालिका हद्दीतील जिल्हा परिषदेमार्फत चालवण्यात येणार्या ५२ प्राथमिक शाळांपैकी १ शाळा पटसंखे अभावी बंद, ५१ शाळांमध्ये ३ हजार ९९२ मुले तर ४ हजार ३५९ मुली अशे एकूण ८हजार ३५१ विध्यार्थी शिक्षण घेत आहेत. ५१ शाळांमध्ये ३१५ शिक्षक कार्यरत, ५ शाळाच्या इमारतींना दुरुस्तीची गरज. शाळा पालिके कडे हसतांतरीत झाल्यास पालिकेवरील बोजा वाढणार, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा पालिकेकडे हस्तांतरित झाल्यास पालिकेला शिक्षण विभागावर दर वर्षी ३२ कोटी ९९ लाख १६ हजार ४०८ रूपये इतक्या खर्चाची तरतूद करावी लागणार आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शिकणारे ५० ते ६० टक्के विध्यार्थी अमराठी शाळा हस्तांतरण प्रकरणी पालिकेच्या अधिकार्यांनी २०१८ साली सादर केलेल्या तपशीलानुसार ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शिकणारे ५० ते ६० टक्के विध्यार्थी अमराठी परप्रांतीय असलेल्या या विध्यर्थ्यांचे पालक मोलमजुरी करतात त्याच प्रमाणे जिल्हा परिषदेच्या बहुतेक शाळांना खेळाचे मैदान नसून शाळांमध्ये शिपाई अथवा सफाई कर्मचारी नसल्याने शाळांमधील अस्वछ शौचालय व वर्गखोल्या सफाईचे काम विध्यार्थी व शिक्षकांना करावे लागते.

# मोबाईल चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने ठोकल्या बेडया

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाड तालुका पो.ठाणे कॉ.गु.रजि. नं.०४/२०२०, भा.द.वि.क.३७९ या गुन्हयातील फिर्यादी यांनी दिनांक २५/०१/२०२० रोजी १३.०० वा.चे सुमारास वीर रेल्वे स्टेशन येथे त्यांचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन रेल्वे स्टेशनचे खिडकी कठडयावर चार्जिंग करीता लावून ठेवला असताना सदरचा मोबाईल फोन कोणीतरी अज्ञात इसमांने फिर्यादीचे संमतीशिवाय चोरुन नेला म्हणून फिर्यादीचे लेखी तक्रारीवरुन सदरचा गुन्हा दिनांक ०८/०२/२०२० रोजी १५.१० वा. दाखल करण्यात आला होता.

मा.पोलीस अधीक्षक सो., रायगड यांचे आदेशान्वये सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून करण्यात येत होता. गुन्हा घडल्यापासून नमुद गुन्हयातील चोरीस गेलेल्या मोबाईल फोनचे सायबर सेल, रायगड यांचे मदतीने नियमीत तांत्रिक विश्लेषण सुरु होते. याच मुदतीत तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे उक्त गुन्हयांतील चोरीस गेलेल्या मोबाईल फोनबाबत माहिती मिळाली. त्याप्रमाणे मा.पोलीस अधीक्षक सो., रायगड यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांनी तात्काळ पोउनि/ महेश कदम, पोलीस अंमलदार पांडुरंग पाटील, संजय धुपकर, प्रतिक सावंत, अनिल मोरे असे पथक रवाना केले. नमुद पथकाने पुणे जिल्हयामधील दौंड तालुक्यातील शिर्सुफळ येथे जावून सहीशराम बुद्धु धुमकेती या इसमास ताब्यात घेतले. त्याचेकडून महाड तालुका पोलीस ठाणे कॉ.गु.रजि.नं.०४/२०२०, भा.द.वि.क.३७९ या गुन्हयातील चोरीस गेलेला मोबाईल फोन हस्तगत केला.

त्याचेकडे मिळालेल्या मोबाईल फोनबाबत सहीशराम बुद्धु धुमकेती यास विश्वासात घेवून तपास केला असता त्याने सदरचा मोबाईल फोन मुर्तुजा मज्जिद वाडेकर, रा.लोणशी मोहल्ला, ता.माणगांव, जि.रायगड याचेकडून घेतल्याचे सांगितले. त्याप्रमाणे नमुद पथकाने तात्काळ मुर्तुजा मज्जिद वाडेकर यास त्याचे राहते पत्त्यावरुन ताब्यात घेतले. त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता त्यानेसुध्दा उक्त गुन्हा केल्याची कबुली दिली. अशाप्रमाणे ०१ वर्षापुर्वी दाखल मोबाईल चोरीच्या गुन्हयातील दोन आरोपींना सदर पथकाने मुद्देमालासह ताब्यात घेवून गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री.अशोक दुधे यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शनानूसार व मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.सचीन गुंजाळ यांचे अधिपत्याखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.दयानंद गावडे, पोउनि/ महेश कदम, पोलीस अंमलदार पांडुरंग पाटील, संजय धुपकर, प्रतिक सावंत, अनिल मोरे आणि सायबर क्राईम पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार अक्षय पाटील व तुषार घरत यांनी मदत केली आहे.

# साळाव-मुरुड उर्वरित रस्त्याचे डांबरीकरण रखडले : वाहनचालक व प्रवासी वर्गातून नाराजी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**



गेल्या पंधरा दिवसांपासून साळाव-मुरुड उर्वरित रस्त्याचे डांबरीकरण काम रखडले असल्याने सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कारभाराबाबत वाहनचालक व प्रवासीवर्गातून नाराजी व्यक्त होत आहे. साळाव- मुरुड रस्त्यावर उर्वरित रस्त्याच्या कामाला मागील महिन्यापासून सुरुवात करण्यात आली होती. याकामात नांदगाव गणपती मंदिर ते पांगाळे पर्यंत डांबरीकरण करण्यात आले. परंतु गेल्या पंधरा दिवसांपासून काम बंद असून पुढील कामे पांगाळे, दांडा, सर्वे, प्रकृती स्टॉप, काशिद बीच ते यु-टर्न चढण पर्यंतचे काम रखडल्यामुळे वाहनचालक व प्रवासीवर्गातून नाराजी व्यक्त केली जात असून तातडीने डांबरीकरण काम करण्यात यावे. अशी मागणी जोर धरीत आहे.

# श्री महागणपती रिक्षा संघटनेचा द्वितीय वर्धापन दिनी रिक्षातून मोफत प्रवास सेवेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

श्री महागणपती तीन आसनी ऑटो रिक्षा चालक मालक संस्थेचा द्वितीय वर्धापन दिन शिवजयंतीचे औचित्य साधून विविध उपक्रमांनी शुक्रवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२१ रोजी साजरा करण्यात येणार आहे.

श्री महागणपती तीन आसनी ऑटो रिक्षा चालक मालक संस्था द्वितीय वर्धापन दिन शिवजयंती च्या दिवशी साजरा करीत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज्यांना मनाचा मुजरा म्हणून रिक्षा संघटने मार्फत त्या दिवशी सकाळपासून ते दुपार पर्यंत चिरनेर ते खारपाडा, चिरनेर ते कोप्रोली ,चिरनेर ते दिघोडे असा मोफत प्रवास प्रवाशांसाठी देण्यात येणार आहे.

तसेच सायंकाळी सत्यनारायणाची महापूजा होणार आहे यानिमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थापक रावण फोफेरकर, अध्यक्ष अमित फोफेरकर, सचिव अमित म्हात्रे , खजिनदार संतोष नारंगीकर यांच्या कडून करण्यात आले आहे.

# अवैद्य पार्किंगमुळे तळा बाजारपेठेत वाहतूक कोंडी

## समस्या जैसे थे..प्रशासनाचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा बाजारपेठेत दिवसेंदिवस अवैद्य पार्किंग मुळे वाहतूक कोंडीची समस्या वाढत चालली आहे. बाजारपेठेत खाजगी वाहनांच्या पार्किंग मुळे वाहतूक कोंडीची समस्या उद्भवत आहे. मात्र याकडे तळा नगरपंचायत दुर्लक्ष करीत असल्याचे पहायला मिळत आहे.



तळा शहरातील बाजारपेठ ही अगदी लहान असून बाजारात येणारे नागरिक आपली दुचाकी व चारचाकी कोठेही पार्क करत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. दर बुधवारी भरणारा आठवडा बाजार हा बसस्थानक शेजारी असल्याने तालुक्याबाहेरील वाहने बसस्थानकात लावली जातात. यामुळे एस टी लावण्यास चालकाला अडचण निर्माण होते त्यामुळे चालक एस टी बाहेरच लावत असल्याने परिणामी मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडीची समस्या उद्भवते. त्यामुळे नगरपंचायतीने आशा वाहनांवर दंडात्मक कारवाई करावी जेणेकरून बाजारपेठेतील वाहतूक कोंडीची समस्या सुटेल. तरी प्रशासनाने लक्ष घालावे अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# ऐरोली-कळवा दुहेरी उन्नत रेल्वे मार्गाकरिता सिडकोकडून एमआरव्हीसीला दिघा येथील जमीन देण्यात येणार

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडकोतर्फे नवी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनला (एमआरव्हीसी) ऐरोली-कळवा दुहेरी उन्नत रेल्वे मार्ग विकसित करण्यासाठी नवी मुंबईतील दिघा येथील सर्व्हे क्र. १०, ५६६ चौ.मी. क्षेत्रफळाची आणि सर्व्हे क्र. २२, हिस्सा क्र. १,२ (पी), ३५३ चौ.मी. क्षेत्रफळाची, अशी एकूण ९१९ चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन देण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. एमआरव्हीसीकडून सिडकोला २०१८ मध्ये ऐरोली-कळवा दुहेरी उन्नत रेल्वे मार्ग विकसित करण्यासाठी दिघा येथील उपरोक्त जमीन हस्तांतरीत करण्याबाबतची विनंती करण्यात आली होती.

सदर जमिनीकरिता कोणताही आराखडा तयार करण्यात आला नसून ती नॉन नोडल क्षेत्रामध्ये मोडत आहे. सदर जमिनीचा बहुतांशी भाग हा प्रादेशिक उद्यान क्षेत्रात (रिजनल पार्क झोन) आणि अल्प भाग हा निवासी क्षेत्रात आहे. एमआरव्हीसी हा केंद्र शासनाचा रेल्वे मंत्रालया अंतर्गत येणारा सार्वजनिक उपक्रम आहे. तसेच नवी मुंबई भूमी विनियोग (सुधारित) अधनियम, २००८ नुसार सिडकोकडून जाहीर निविदा किंवा लिलावाद्वारे भूखंडांची विक्री करण्यात येते. परंतु यास केंद्र शासन/राज्य शासन आणि त्यांचे उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा स्वायत्त शासकीय संस्था यांचा अपवाद असून संबंधितांकडून अर्ज प्राप्त झाल्यावर भाडेपट्टा अधिमूल्याच्या दराने त्यांना भूखंड वाटपित करण्यात येतात.

या सर्व बाबींचा तसेच सार्वजनिक हिताच्या प्रकल्पांना सहकार्य करण्याच्या उद्देशाने दिघा येथील सदर ९१९ चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन ही रु. २२,५००/- प्रती चौ.मी. या दराप्रमाणे रु. २,०६,७७,५००.००/- (रु. दोन कोटी सहा लाख सत्त्याहत्तर हजार पाचशे मात्र) भाडेपट्टा अधिमूल्य आकारून ९० वर्षांच्या भाडेपट्ट्याने एमआरव्हीसीला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उपरोक्त दर हा चालू आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत म्हणजे ३१ मार्च २०२१ पर्यंत वैध असून वाटप पत्र ३१ मार्च २०२१ पूर्वी दिले न गेल्यास सुधारित दर लागू होईल. भाडेपट्टा अधिमूल्याव्यतिरिक्त उर्वरित शुल्क, जीएसटी आणि वार्षिक भाडेही आकारण्यात येणार आहे. तसेच सदर जमिनीचा वापर हा केवळ ऐरोली-कळवा उन्नत रेल्वे मार्गाच्या उभारणीकरिता करता येणार असून अन्य कोणत्याही उद्देशाकरिता करता येणार नाही. सदर बाब ही नवी मुंबई भूमी विनियोग (सुधारित) अधिनियम, २००८ मधील अधिनयमांच्या अधीन राहील.

> सार्वजनिक हिताच्या प्रकल्पांना सहकार्य करण्याच्या भूमिकेतून सिडकोने हा निर्णय घेतला आहे. सदर रेल्वे मार्गामुळे ठाणे स्थानकावरील गर्दीचा भार कमी होण्यासह कल्याण दिशेकडून येणाऱ्या प्रवाशांचा प्रवास सुखकारक होण्यास निश्चितच मदत होणार आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# सद्गुरू संत श्री सेवालाल महाराज यांची २८२ वी जयंती माणगांवमध्ये उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

संपुर्ण महाराष्ट्रात अतिश्रम, काबाडकष्टाची कामे करून उदरनिर्वाह करणारा गोरबंजारा समाज महाराष्ट्रासह बेळगांव, कर्नाटक राज्यातून सहकुटुंब महाराष्ट्रात स्थलांतरित होत असतो. माणगांव शहरातील गोरबंजारा समाज सामाजिक मंडळाच्या वतीने समाजाचे आराध्य दैवत सद्गुरू संत श्री सेवालाल महाराज यांची दरवर्षी मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात येते. यंदाही समाजाचे माणगांव तालुकाध्यक्ष पुन्नु राठोड यांच्या एकता नगर येथील निवासस्थानी जयंती निमीत्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माणगांव तालुक्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बजाविणारे मान्यवर व शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश प्राप्त केलेले विध्यार्थी यांचा गौरव करण्यात आला.



या कार्यक्रमाचे उदघाटन माणगांवचे माजी नगराध्यक्ष आनंद यादव यांच्या हस्ते सेव-ालाल महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन व दिपप्रज्वलन करुन करण्यात आले. या नंतर राजकीय क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरीबद्दल नगराध्यक्ष आनंद यादव,उपनगराध्यक्ष दिलीप(बबडी) जाधव, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे ,चेतन गवाणकर, सुमित काळे यांचा शाल श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तर, शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल दिनेश महाडीक, तुषार बगडे, रविंद्र मोरे, राठोड सर यांना गौरविण्यात आले. व सामाजिक क्षेत्रातील कामगिरी बद्दल रायगड जिल्हा नाभिक समाज उपाध्यक्ष महेंद्र जाधव, विधी व न्याय स्वंयसेवक प्रसाद जाधव व जेष्ठ समाजसेवक मेघाशेठ मुद्राळे यांना गौरविण्यात आले. तर प्रशासकीय क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरी बद्दल नायब तहसिलदार म्हसळा किसन भिंगारे, संजय ठाकर, निलेश गावणकर यांना सन्मानित करण्यात आले. तर प्रसारमाध्यम क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरी बाबत पत्रकार प्रमोद जाधव यांना गौरविण्यात आले. संत सेवालाल महारांजाचे सामाजिक कार्याबद्दल समाज बांधवाना संबोधित करताना राठोड सर यांनी सांगितले की फक्त स्वत:च्या समाजापुरतेच मर्यादीत न रहाता संत सेवालाल महाराजांनी कार्य केले १७ व्या शतकापासुन आज पर्यंत गोरबंजारा समाज अश्या महान संताची जयंती साजरी करत आला आहे. आणि आजची २८२ वी जयंती साजरी होत आहे. हे प्रकर्षाने सांगताना सेवालाल महाराजांचे त्या काळात कोकणाशी संबंध फार चांगले होते. त्याकाळात बाराबलुतेदारी व वस्तुरुप देवाण घेवाण पध्दती सुरु असता सेव-ालाल महारांजाकडुन कोकणातील मीठागरातुन मीठ नेऊन त्या बदल्यात धान्याची परतफेड होत होती. गोरबंजारा समाज हा पुर्वीपासुन भटकंती व तांड्याने राहणारा समाज असल्याने संत सेवालाल महाराजांचे वडील त्या काळात ७०० तांड्याचे प्रमुख नायक (मुकादम) होते. सेवालाल महाजांना मोतीवालो, गादीवालो, धोळीघोडीवाले या प्रमुख नावाने त्याकाळी ओळखले जायचे. अश्या महान संताचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन प्रत्येक समाज बांधवाने कार्य करावे असे राठोड सर यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

कोरोना महामारी असो किंवा निसर्ग चक्रीवादळ असो या काळात समाजाचा एक प्रतिनिधी म्हणुन शासनाचे वेळोवेळी उंबरठे झिजवुन आवश्यक असणारी मदत प्रत्येक समाज घटकांपर्यत पोहचविण्याचे काम मी माझ्या कुटुंबीयांनी केले आहे. आमचा समाज हा काही प्रमाणात अल्पशिक्षित व अशिक्षित देखील आहे. सामाजिक विचारांची देवाण-घेवाण व सुख-दुख: एकमेकांना कळावित या करीता सेवालाल जयंतीचे औचित्य साधुन आमच्या कडुन असे समाजपयोगी कार्यक्रम घेतले जात असतात. असे उदगार गोरबंजारा समाजाचे तालुकाध्यक्ष पुन्नु राठोड यांनी काढले. माणगांव, तळा, रोहा, म्हसळा तालुक्यातील शेकडो गोरबंजारा समाजबांधवानी या कार्यक्रमास उपस्थिती दाखविली व कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तुषार बगडे सर यांनी केले. महाप्रसाद व स्नेहभोजनाने कार्यक्रमाचा शेवट आभार प्रदर्शनाने करण्यात आला.

# आयुष्य व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्रातर्फे फुगे विकणाऱ्या लहानग्यांना खाऊचे वाटप व व्यसमुक्तीसाठी जनजागृती



**दै.रायगड नगरी । पाली/वाघोशी**

आयुष्य व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र यांच्यातर्फे माघी गणेशोत्स-वात फुगे विकणाऱ्या लहानग्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच यावेळी व्यसनमुक्ती संदर्भात जनजागृती देखील करण्यात आली. केंद्राचे सदस्य अंकुश आपटे यांनी सकाळला सांगितले की माघ गणेश जयंती सण साजरा करायचा होता, पण तो थोडया वेगळ्या पद्धतीने करण्याचे ठरविले. पोटाची खळगी भरण्यासाठी दिवसभर उन्हातान्हात फिरून फुगे विकणारी मुले दिसली. त्या सर्वांसाठी खाऊ व पाणी वाटप केले. तसेच स्वतः व्यसनातून मुक्त झालो असल्याने इतरांना देखील या व्यसनातून मुक्त करण्यासाठी जनजागृती देखील केली. आणि अशा प्रकारे गणेशोत्सव साजरी केला असे अंकुश आपटे म्हणाले. खाऊ मिळाल्याने त्या फुगे विकणाऱ्या लहानग्यांच्या चेहऱ्यावरील आनंद खूप समाधान देऊन गेला असे उपस्थितांनी सांगितले. यावेळी अंकुश आपटे, अभिज्ञा आपटे, विकी थोरात व वैभव शिंदे उपस्थित होते.